# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३१/०१/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### अपघातात जखमी

पो.स्टे. सावेनर :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा हेटी शिवार, हायवे पोलीस चौकी जवळ येथे दिनांक ३०/०१/२०२२ चे १२.४५ वा. दरम्यान फिर्यादीचे वडील **चिरकुट रामाजी बनाईत (जखमी)**, **वय ६२ वर्ष** हे आपली एम. एच– ४०/बी. आर– ९६७२ क्रमांकाच्या मोटरसायकलने हेटी शिवारातील भाचीचे शेतात जात असता मागुन येणारी एम.एच– ३१/ई.यु– ८४९३ क्रमांकाच्या कारचा चालक आरोपीने आपली कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वडीलाचे मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे वडील हे खाली पडले व त्यांना उजवे पायाला व डावे पायाला मार लागुन जखमी झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रकाश चिरकुट बनाईत, वय ३५ वर्ष रा. वार्ड क्र. १७ शिवाजी पूतळया जवळ सावनेरयांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७ भादंवी. सहकलम १८४, १३४ (ब) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार देवशंकर गुप्ता हे करीत आहे.

### शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. सावनेर :– फिर्यादी नामे– सौ. शुभांगी अक्षय डांइफोडे वय २२ वर्ष रा. पाटणसावंगी ता. सावनेर ह.मु. जयभिम नगर महादुल्ला कोराडी ता. कामठी व आरोपी नामे– १) पति– अक्षय अशोक डोईफोडे हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा पाटणसावंगी वार्ड क्र. ३ येथे दिनांक २८/०१/२०१९ ते दिनांक १७/१२/२०२१ पावेतो आरोपी नामे– १) अक्षय अशोक डोईफोडे, २) सौ. राजश्री अशोक डोईफोडे, ३) अशोक लिखन डोईफोडे, ४) अभिषेक अशोक डोईफोडे सर्व रा. पाटणसावंगी, ५) सौ. किरण अजय मदने व ६) अजय मदने दोन्ही रा. काटोल यांनी संगनमत करून फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ४९८ (अ), ३२३, २९४, ५०६, ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि निषांत फुलेकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर